नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/११/२०२५ ( रविवार )**

---

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करीत असतांना निष्काळजीपणाने वाहन चालवुन वाहन पेटण्यास व जनावरांच्या मृत्युस जबाबदार आरोपीचा तात्काळ शोध घेवुन ३ आरोपीतांना घेतले ताब्यात, आरोपी अटक प्रक्रीया सुरू

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :—दिनांक १५/११/२५ रोजी कळमेश्वर पोलीसांना डायल ११२ वर माहीती प्राप्त झाली की, फेटरी येथे नागपुर ते काटोल रोडवर एका ट्रकला आग लागली आहे. कळमेश्वर पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता एक टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक एम एच ४० सी.डी ५०९४ हा जळतांना दिसला. वाहन चालकाबाबत विचारपुस केली असता चालक घटनास्थळावरून पळुन गेल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ अग्निशमन दलास बोलावुन आग विझविली. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात गोवंश जनावरे दिसुन आली. नमुद जानावरे दोरखंडाने बाधुंन निर्दयतेने कोंबुन असल्याचे दिसुन आले. एकुण ३७ जानावरे मिळुन आली पैकी २९ जनावरे मृत पावली होती तसेच ८ गोवंश जनावरे जिवंत मिळुन आले. त्या जनावरांना राउळगाव येथील जैन गोशाळेत दाखल करण्यात आले. नमुद वाहन चालक आरोपी याने अवैधरित्या जनावरांची वाहतुक करीत असतांना त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालविण्याने वाहनाचा टायर फुटला. **टायर फुटल्यानंतर सुध्दा नमुद चालक आरोपी याने दुघर्टना होवु शकते हे माहीती असतांना सुध्दा सदर वाहन न थांबविता चालवित राहील्याने रोडचे आणि टायरचे घर्षण झाल्याने आग लागली.** टायर ने पेट घेतल्यानंतर सुध्दा आरोपीने नमुद वाहन महामार्ग क्र एन एच ३५३ जे वर चालविल्याचे रोड चे सुध्दा नुकसान झाले. आरोपीला वाहनाला लागलेल्या आगी मुळे नजिकच्या वस्त्यामध्ये जिवीत हानी होवु

शकते हे माहीती असतांना सुध्दा तो पेटलेला ट्रक सोडुन पळुन गेला. सदर प्रकरणाचे गांर्भिय लक्षात घेता मा.श्री. हर्ष ए. पोद्दर, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने तात्काळ आरोपीतांचा शोध घेत नमुद **वाहन मालक आरोपी क्र १) नामे मोहम्मद नासिर मोहम्मद शफी कुरेशी ,वय ४१ वर्षे ,रा. खापा ता सावनेर ,ह.मु बुर्ज खलीफा होटल जवळ, महेंद्र नगर, टेका नाका, नागपुर याला बडनेरा, नयीबस्ती, जि. अमरावती येथुन ताब्यात घेतले. तसेच वाहन चालक आरोपी क्रं २) नामे सय्यद उर्फ सोनु सुलतान हमीद अली, वय ३२ वर्षे, रा प्लॉट क्र २३८ आके ले आउट ,आजरी माजरी, यशोधरा नगर, नागपुर आणि क्लिनर आरोपी क्रं ३) नामे अमीर रहुफ कुरेशी, वय २९ वर्षे, रा महेंद्र नगर, पाण्याचे टाकी जवळ, पाचपावली नागपुर यांना टेका नाका येथुन ताब्यात घेतले आहे. नमुद आरोपीतांना अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे.**

**सदर प्रकरणी नमुद आरोपीवर कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे ३२६(ग), ६१(२), भा.न्या. सं ५(१),(अ) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम , ११(१) (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १३४/१७७ मोटर वाहन अधिनियम, ८ (ब) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, ३ (१) सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम , कलम ७ फौजदारी सुधारणा कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ११ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :—दिनांक १५/११/२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की भंडारा कडुन नागपुर कडे दोन वाहनांमध्ये अवैधरित्या कत्तलीकरीता गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी वडोदा शिवारातील वडोदा पुलाजवळ नाकाबंदी केली असता संशयीत महींद्रा बोलोरो पिकअप क्रमांक एम एच ४० सी.टी. ७९३९ आणि टाटा योध्दा वाहन क्रमांक एम एच ३० बी.डी. ३८४० येताना दिसले. पोलीसांनी वाहन चालकास थांबण्याचा इशार केला

असता पोलीसांना पाहुन दोन्ही वाहन चालकांनी कल्पना कंपनीकडे जाणाऱ्या रोडवर वाहने थांबवुन अंधाराचा फायदा घेवनु वाहने सोडुन पळुन गेले. नमुद वाहनाची पाहणी केली असता बोलोरो पिकअप क्रमांक एम एच ४० सी.टी. ७९३९ मध्ये ४ गोवंश जनावरे तसेच टाटा योध्दा वाहन क्रमांक एम एच ३० बी.डी. ३८४० मध्ये ७ गोवंश जानावरे दोरखंडाने बाधुंन निर्दयते कोंबुन, चारापाण्याची सोय न करता वाहतुक करतांना मिळुन आले. एकुण ११ गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष महींद्रा बोलोरो पिकअप क्रमांक एम एच ४० सी.टी. ७९३९ , टाटा योध्दा वाहन क्रमांक एम एच ३० बी.डी. ३८४० आणि ११ जानवरे एकुण किंमती १३,१०,००० /— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद प्रकरणी दोन्ही वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ५ गोवंशाची सुटका, देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :—दिनांक १६/११/२०२५ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, जबलपुर कडुन नागपुर कडे लाल रंगाच्या झायलो गाडीमध्ये अवैधरित्या कत्तलीकरीता गोवंश जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी जुने देवलापार पोस्टे समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी पासुन काही अंतरावर संशयीत लाला रंगाची कार उभी दिसली. पोलीस संशयीत कारजवळ जात असतांना सदर चालक हा कार सह पळुन जाण्याच्या तयारीत होता. पंरतु पोलीसांना पाहुन वाहन चालक वाहन जागेवरच सोडुन पळुन गेला. पोलीसांनी लाल रंगाची झायलो वाहन क्रमांक एम एच ०४ एन.टी. ८५५० ची पंचासमक्ष तपासणी केली असता ५ गोवंश जनावरांना वाहानाचे मागचे सिट काढुन एकावर एक दोरखंडाने बाधुंन निर्दयते कोंबुन, चारापाण्याची सोय न करता क्रुरतेने वाहतुक करतांना मिळुन आले. एकुण ५ गोवंश जनावरंाची सुटका करण्यात आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष झायलो वाहन क्रमांक एम एच ०४ एन.टी. ८५५० आणि ०५ गोवंश जानवरे एकुण किंमती ३,९५,००० /— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद प्रकरणी झायलो वाहन क्रमांक एम एच ०४ एन.टी. ८५५० चा वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम तसेच मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री, सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २६ गुन्हे नोंद.
# ४ लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १५/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच ईतर साहीत्य असा एकुण ४,१८,४८५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे २ गुन्हे नोंद आह. पोलीस स्टेशन उमरेड येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन वेलतुर येथे १ गुन्हा नोंद आह. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन रामटेक येथे ३गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ४ गुन्हे नोंद आहे पोलीस स्टेशन अरोली येथे २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद आहे.असे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण २६ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत २३८५० मिली देशी दारू किंमती १०,६३५/—रूपये, २२७३ लीटर मोहाफुल दारू किंमती २,१०,८००/— रूपये, १९८५ लिटर सडवा, किंमती १,७१,२५०/—रूपये, तसेच ईतर साहीत्य किंमती २५,८००/— रूपये असा एकुण ४,१८,४८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक १५/११/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक १६/११/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये पोलीस निरीक्षक श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन बोरी आणि एमआयडीसी बोरी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने